## ज्योतिषविषयक

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com





**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**

दारू... अंमली पदार्थ... गॅरंटेड सुटण्यासाठी...

व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..

(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**

फोन: 9552619752

कॉल / व्हॉटस्‌ॲप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...

501% रिझल्ट



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १३९ वा | बुधवार, दि. ३१ डिसेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# सोलापूरात गोंधळ! भाजपाचे एबी फॉर्म वेळेत न पोहचल्याने संताप

## विरोधकांचा दारातच ठिय्या

## वेळेच्या मर्यादेवरून वाद; निवडणूक आयोगाकडे लेखी तक्रार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा मंगळवार, दिनांक ३० डिसेंबर २०२५ हा शेवटचा दिवस असताना, भाजप उमेदवारांच्या A.B. फॉर्मवरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. काँग्रेस पक्षाने भाजपच्या उमेदवारांच्या A.B. फॉर्म दाखल करण्याच्या वेळेवर आक्षेप घेत निवडणूक आयोगाच्या नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप केला आहे.





काँग्रेस पक्षाच्या वतीने सर्व उमेदवारांचे A.B. फॉर्म दुपारी ३ वाजण्यापूर्वी नियमानुसार दाखल करण्यात आले, असे काँग्रेस नेत्यांनी स्पष्ट केले. मात्र भाजपचे शहर अध्यक्ष व वरिष्ठ नेते दुपारी २:४५ वाजता मुख्य निवडणूक कार्यालय असलेल्या नॉर्थकोट तांत्रिक प्रशाला, सोलापूर येथे A.B. फॉर्म घेऊन दाखल झाले. त्यानंतर एकूण सात निवडणूक कार्यालयांमध्ये हे फॉर्म सादर करताना वेळ लागल्याने अंतिम मुदत ओलांडली गेल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.

काँग्रेसच्या म्हणण्यानुसार, भाजपचे A.B. फॉर्म दुपारी ३:०५ वाजता दाखल करण्यात येत असताना शहर अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे व मित्रपक्षांच्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली तीव्र हरकत नोंदविण्यात आली. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार ठरलेल्या वेळेनंतर A.B. फॉर्म स्वीकारणे चुकीचे असल्याचे काँग्रेसने स्पष्टपणे मांडले.

या संपूर्ण प्रकरणाबाबत सोलापूर शहर काँग्रेस पक्षाच्या वतीने मुख्य निवडणूक आयुक्त तसेच सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त यांच्याकडे लेखी तक्रार सादर करण्यात आली आहे. हे निवेदन काँग्रेसचे सरचिटणीस अँड. केशव इंगळे, काँग्रेसचे मीडिया प्रमुख तिरुपती परकीपंडला तसेच युवक काँग्रेसचे रुपेश इंगळे यांनी सादर केले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, निवडणूक प्रक्रियेत सर्व पक्षांसाठी नियम समान असावेत आणि कोणत्याही पक्षाला वेळेच्या नियमांबाबत सवलत दिली जाऊ नये. जर नियमानुसार वेळेच्या बाहेर अ.इ. फॉर्म दाखल झाले असतील, तर संबंधित उमेदवारांची उमेदवारी रद्द करावी, अशी ठाम मागणी काँग्रेसकडून करण्यात आली आहे.

या घटनेमुळे सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण अधिकच तापले असून, निवडणूक आयोग या प्रकरणावर काय निर्णय घेतो याकडे सर्व राजकीय पक्षांचे आणि मतदारांचे लक्ष लागले आहे.

# वाळू माफियांपुढे प्रशासन झुकले का? वकिलावर जीवघेणा हल्ला

## भारत नाना पाटील यांच्यावर काळे तेल; राम सातपुते यांचा हात असल्याचा आरोप

## आय पी एस अंजना कृष्णा व टेंभुर्णी पोलिसांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न, फडणवीसांची चौकशी आदेश

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या अवैध वाळू उत्खननातून माढा तालुक्यात कायदा-सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, या प्रकरणाला आता थेट राजकीय आणि प्रशासकीय वळण लागले आहे. अकोले खुर्द येथील वकील भीम पांडुरंग तोडकर यांच्यावर वाळू तस्करांनी केलेल्या जीवघेण्या हल्ल्याचे पडसाद थेट विधिमंडळ अधिवेशनात उमटले. या प्रकरणात पोलिस व महसूल प्रशासनाची भूमिका संशयास्पद असल्याचा आरोप करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौकशीचे आदेश देण्याची घोषणा केली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील वाळू तस्करीशी संबंधित सर्वात गंभीर घटना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या हल्ल्यानंतरही अवैध वाळू उपसा रोखण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे, करमाळा विभागाच्या धडाडीच्या प्रशिक्षणार्थी आयपीएस अधिकारी अंजना कृष्णा व्ही.एस. यांची प्रतिमा कडक आणि दबंग अधिकारी म्हणून ओळखली जाते. करमळ्यापासून 50 ते 55 किलोमीटर अंतरावर जाऊन करवाई करतात मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या फोनवरही विश्वास न ठेवता व्हिडिओ कॉल करण्यास भाग पाडणाऱ्या अंजना कृष्णा यांनी कुर्डू गावातील मुरम उत्खननावर मोठी कारवाई केली होती. मात्र, करमाळ्यापासून अवघ्या ३० ते ३५ किलोमीटर अंतरावर असलेले टेंभुर्णी, अकोले खुर्द, फूट जवळगाव परिसरातील मोठमोठे वाळू उत्खननाचे आड्डे त्यांना का दिसले नाहीत, महाराष्ट्र मध्ये अल्पवयीन मुलीवरती होणाऱ्या अत्याचाराला अळा बसण्यासाठी फोक्सो सारख्या ॲट्रॉसिटी सारख्या अनेक गुन्हेचा तपास होत नाही.

असा थेट सवाल आता उपस्थित होत आहे.























टेंभुर्णी पोलीस ठाण्यापासून अवघ्या सात ते आठ किलोमीटर अंतरावर अनेक दिवसांपासून खुलेआम वाळू काढली जात असताना पोलीस आणि महसूल यंत्रणा 'आंधळी' कशी बनली, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. वाळू तस्करांवर कारवाई करण्याचे धाडस दोन अधिकारी का करू शकत नाहीत? त्यांना कुणाचा आशीर्वाद आहे? राजकीय दबाव आहे की आर्थिक साटे-लोटे ? असे प्रश्न आता उघडपणे नागरिकात चर्चेत आहेत.

या पार्श्वभूमीवर, वाळू माफियांविरोधात मोर्चे काढून आक्रमक भूमिका घेणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व जिल्हा लेबर, क्रीडा व रेशन समितीचे चेअरमन भारत नाना पाटील यांच्यावर काळे तेल ओतण्याचा धक्कादायक प्रकार घडला. अकोले खुर्द येथील वकील तोडकर यांना मारहाण करून हातपाय मोडल्याच्या घटनेनंतर अकोले खुर्द व फूट जवळगाव ग्रामस्थांनी ग्रामपंचायत ठराव करून वाळू बंदी जाहीर केली होती. आरोपींना अटक करा, अन्यथा रस्ता रोको करू, असा इशारा भारत नाना पाटील यांनी दिला होता. याच रागातून टेंभुर्णी-करमाळा रोडवरील पुलाजवळील हॉटेलसमोर दोन तरुणांनी त्यांना धरून ठेवत, शिवीगाळ व घोषणाबाजी करत त्यांच्या अंगावर काळे तेल ओतल्याचा आरोप आहे.

हा प्रकार घडल्यानंतर अवघ्या पाच मिनिटांत पोलिस घटनास्थळी पोहोचून आरोपींना ताब्यात घेतल्याने उलट प्रश्न उपस्थित झाले आहेत. अनेक गंभीर गुन्ह्यांतील आरोपी महिना-महिना फरार राहतात, मात्र या घटनेत पोलिसांची तत्परता इतकी कशी, यामागे राजकीय दबाव आहे का, अशी चर्चा माढा तालुक्यात रंगली आहे. या घटनेमागे आमदार राम सातपुते यांचा हात असल्याचा संशय भारत नाना पाटील यांनी सोशल मीडियावरील मुलाखतीत व्यक्त केला आहे.

याबाबत टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी आम्ही अन्य कारवाईसाठी जात असताना हा प्रकार समोर आल्याने तातडीने हस्तक्षेप केल्याचे स्पष्टीकरण दिले आहे. मात्र, दिवसभर टेंभुर्णी पोलीस ठाण्यात अकोले खुर्द व फूट जवळगाव येथील नेते, ग्रामस्थ ठाण्यात ठाण मांडून बसले होते. गुन्हे दाखल करण्यास उशीर का झाला, असा सवाल उपस्थित झाला. अखेर गावकऱ्यांच्या दबावामुळे संध्याकाळी उशिरा गुन्हा दाखल झाल्याचे चित्र आहे.

दरम्यान, एकाच दिवशी टेंभुर्णी शहरात दलित समाजाचा मोर्चा, अकोले खुर्द-फूट जवळगाव ग्रामस्थांचा मोर्चा आणि भिमानगर येथे शेतकरी संघटनेचा मोर्चा असे तीन मोर्चे निघाले. हे मोर्चे सीसीटीव्हीत कैद झाले असून, ते आमने-सामने आले असते तर संपूर्ण महाराष्ट्रात दोन समाजांत तेढ निर्माण झाली असती, अशी भीती व्यक्त होत आहे. अशा परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था राखण्यात टेंभुर्णी पोलीस ठाणे पूर्णपणे अपयशी ठरल्याचा आरोप होत आहे. याआधीही अशाच प्रकारातून वीस वषार्खाली पोलीस उपनिरीक्षक डी. बी. गोरे यांची बदली झाल्याची आठवण टेंभुर्णी नागरिकातून होत आहेत.

या सर्व प्रकरणावर अधिवेशनात चर्चा होताच करमाळा विभागीय अधिकारी आयपीएस अंजना कृष्णा व्ही.एस. आणि टेंभुर्णी पोलीस निरीक्षक नारायण पवार यांची चौकशी करून निलंबनाची मागणी करण्यात आली. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माढा तालुक्यातील वाळू माफिया, पोलिस व प्रशासनाची सखोल चौकशी करून कारवाई केली जाईल, असे स्पष्ट आश्वासन दिले.

आज या चौकशीकडे संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी या प्रकरणात नेमकी काय भूमिका घेतात, दोषींवर खरोखर कारवाई होते की पुन्हा बळीचा बकरा शोधला जातो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. अन्यथा, वाळूसाठी पुन्हा कुणाला जीव गमवावा लागला तर त्याची जबाबदारी कोणाची, असा थेट सवाल आता सर्वसामान्य नागरिक प्रशासनाला





**जिजाऊ महिला मंडळ तीर्थक्षेत्र अरण, ता. माढा, जि. सोलापूर संचलित**

**स्वयं अर्थसहाय्यित तत्वावरील यशोदा गुरुकुल पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयासाठी एप्रिल २०२६ पासून खालील पदे भरावयाची आहेत**

**मुलाखतीसाठी आमंत्रण!**

| अ.नं. | पदाचे नाव | पात्रता | जागा | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | मुख्याध्यापक-प्राचार्य | M. A. / M.Sc. B.Ed. D.S.M. | २ | ५ वर्षे |
| २ | सहशिक्षक | M.Sc/B.Sc. B.Ed. (Mths. Sci.) | ४ | १ वर्ष |
| ३ | सहशिक्षक | M.A. / B.A. B.Ed. / D.Ed.(Eng.) | ४ | १ वर्ष |
| ४ | सहशिक्षक | M.A. / B.A. B.Ed. / D.Ed. (Mar. Hin) | ३ | १ वर्ष |
| ५ | सहशिक्षक | M.A. / B.A. B.Ed. / D.Ed.(So.Sci.) | २ | १ वर्ष |
| ६ | शा. शि. शिक्षक | B.A. B.P.Ed. | १ | १ वर्ष |
| ७ | चित्रकला शिक्षक | A.T.D. | १ | १ वर्ष |
| ८ | संगीत शिक्षक | Sangeet Visharad | १ | १ वर्ष |
| ९ | संगणक शिक्षक | B.C.A. | १ | १ वर्ष |
| १० | पूर्व प्राथमिक शिक्षिका | Montessory / N.T.T.Course | ६ | १ वर्ष |
| ११ | वसतिगृह अधीक्षक | Graduate | १ | १ वर्ष |
| १२ | लिपिक | B.A./B.Com. MS.-C.I.T. | १ | १ वर्ष |
| १३ | ग्रंथपाल | L.T.C. | १ | १ वर्ष |
| १४ | ड्रायव्हर | WITH VALID LICENSE | ७ | २ वर्षे |
| १५ | बागकामासाठी माळी | बागकामाची आवड | १ | - |
| १६ | पहारेकरी | सातवी | १ | - |
| १७ | शिपाई | S.S.C. | २ | - |

**महत्त्वाची माहिती** (Important Details)

इच्छुक उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह दि. १०/०१/२०२६ व ११/०१/२०२६ रोजी स. १० ते दु. २ ह्या वेळेत यशोदा गुरुकुल, मौजे - अरण, ता. माढा, जि. सोलापूर येथे मुलाखतीसाठी समक्ष उपस्थित रहावे.

**टीप :- समाधानकारक व नियमित वेतनाची १००% हमी !**

**संपर्क :- श्री. हरिदास रणदिवे (सर) 9422428857**


# पक्षनिष्ठेच्या त्यागाला न्याय मिळणार का?

## सलग तीन वेळा माघार घेतलेल्या कार्यकर्त्यास स्वीकृत नगरसेवक पद देण्याची जोरदार मागणी

**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** मंगळवेढा नगरपरिषदेच्या अलीकडील निवडणुकांनंतर शहरातील राजकीय समीकरणे स्पष्ट झाली असून, या पार्श्वभूमीवर शनिवार पेठ भागातील ज्येष्ठ कार्यकर्ते सर्जेराव आवताडे यांच्या नावाची चर्चा जोर धरू लागली





आहे. पक्षश्रेष्ठींच्या शब्दासाठी सलग तीन वेळा नगरसेवक पदाच्या निवडणुकीतून माघार घेणाऱ्या या निष्ठावंत कार्यकर्त्यास स्वीकृत नगरसेवक पदाची संधी द्यावी, अशी जोरदार मागणी शहरातील विविध स्तरांतून पुढे येत आहे.

आजपर्यंत पक्ष व पक्षश्रेष्ठींचा आदेश हाच आपला धर्म मानत, सर्वच बाबतीत सक्षम असूनही सर्जेराव आवताडे यांनी नगरपालिका निवडणुकीच्या रिंगणातून सलग तीन वेळा माघार घेतली. या कृतीतून त्यांनी पक्षावर असलेली निष्ठा, (पान 2 वर..)

# रामायणाच्या कथांतून विद्यार्थ्यांचे संस्कारमूल्य शिक्षण



**करमाळा (कटूसत्य वृत्त):–** दत्तकला इंटरनॅशनल स्कूल, करमाळा येथे रामायण या पवित्र व संस्कारक्षम संकल्पनेवर आधारित वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमाचा शुभारंभ आदिनाथ साखर कारखान्याचे ज्येष्ठ माजी संचालक लालासाहेब जगताप व कौशल्यादेवी जगताप यांच्या हस्ते झाला. दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामदास झोळ व सचिवा माया झोळ यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या पदाधिकारी सारिका झोळ, जयमाला बांदल, धनंजय अडसूळ, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. विशाल बाबर, शाळेच्या संचालिका नंदा ताटे व प्राचार्या सिंधू यादव यांची प्रमुख उपस्थिती होती.

या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी रामायणातील विविध प्रसंगांचे नाट्यरूप सादरीकरण, संवाद, संगीत व भावपूर्ण अभिनयाच्या माध्यमातून केले. प्रभू श्रीराम, माता सीता, लक्ष्मण, हनुमान व रावण यांच्या भूमिका साकारताना विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट अभिनय कौशल्याचे दर्शन घडवले.

यावेळी सचिवा माया झोळ तसेच अन्य मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, शिस्त व नैतिक मूल्यांची रुजवणूक होते, असे मत व्यक्त केले. आजच्या तांत्रिक व स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान नव्हे तर आध्यात्मिक व सांस्कृतिक संस्कारांचीही नितांत गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

रामायण व भगवद्गीता हे आपले अमूल्य धर्मग्रंथ असून त्यातील सत्य, कर्तव्य, संयम, त्याग व नीतिमूल्ये दैनंदिन जीवनात अंगीकारल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास निश्चितच होईल, असा विचार यावेळी मांडण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शाळेच्या संचालिका नंदा ताटे यांनी सर्वांचे आभार मानले.

# सिध्देश्वर कृषी व औद्योगिक प्रदर्शनाचा यशस्वी समारोप



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–**ग्रामदैवत शिवयोगी श्री सिध्दरामेश्वर यात्रेनिमित्त आयोजित राज्यस्तरीय श्री सिध्देश्वर कृषी व औद्योगिक प्रदर्शनाचे गुरुवारी यशस्वी समारोप झाले. या प्रदर्शनातून शेती आणि ग्रामीण जीवनाशी निगडित अर्थकारण व कृषी पूरक उद्योजकांना बळ देण्याचे महत्त्वाचे कार्य सुरू आहे, असे प्रतिपादन प्रमुख पाहुणे भोसले यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी होते. यावेळी ज्येष्ठ सदस्य व प्रदर्शन समितीचे सदस्य गुरुराज माळगे, मल्लिनाथ मसरे, प्रभुराज मेंदर्गीकर, विजयकुमार बरबडे, पशुपतीनाथ माशाळ यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

भोसले म्हणाले, 'शेतीचा विकास झाल्यानंतर ग्रामीण भागात समृध्दी येते आणि त्याचा प्रत्यक्ष फायदा शहरालाही मिळतो. सिध्देश्वर कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून कृषी तंत्रज्ञान व पूरक उद्योगांना ग्रामीण भागातील शेतकऱ्यांपर्यंत नेण्याचे कार्य सतत सुरू आहे.'

प्रदर्शनाचे प्रास्ताविक कृषी प्रदर्शन समितीचे अध्यक्ष गुरुराज माळगे यांनी केले. त्यांनी यशस्वी आयोजनासाठी योगदान दिलेल्या सर्वांना आभार मानले.

पानदिवसीय प्रदर्शनात आधुनिक कृषी अवजारे, बी-बियाणे, नर्सरी व रोपवाटिका तंत्रज्ञान नागरिकांच्या विशेष आकर्षणाचे केंद्र होते. दुनाकी, ट्रॅक्टर आणि इतर मशिनरीच्या आर्डर साठी शेतकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, अशी माहिती विजयकुमार बरबडे यांनी दिली. याशिवाय पशु व डॉग प्रदर्शनात महाराष्ट्र व कर्नाटकातून मोठ्या प्रमाणावर स्पर्धक सहभागी झाले.

कार्यक्रमात सहभाग घेतलेल्या संस्था व उत्कृष्ट स्टॉलधारकांना पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सोलापूर जिल्हा, मराठवाडा व कर्नाटकातून मोठ्या संख्येने शेतकरी व उद्योजकांनी या प्रदर्शनाला प्रतिसाद दिला.

धर्मराज काडादी यांनी सांगितले की, 'गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेले प्रदर्शन अत्यंत यशस्वीपणे पार पडले. तंत्रज्ञानात होत असलेल्या झपाट्याने बदलाच्या पार्श्वभूमीवर आपल्याला आणखी पुढे जायचे आहे. कृषी प्रदर्शन सवार्ना सोयीस्कर होण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे.'

प्रदर्शनात योगदान दिलेल्या काही प्रमुख संस्थांमध्ये जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), रोझ क्लब ऑफ सोलापूर, कांचन इंजिनीअर्स, ओम साई ट्रॅक्टर्स, न्यू मयूर अॅग्रीकल्चर वर्क्स, तिरुपती उद्योग समूह, स्वामी तंत्रज्ञान आणि संशोधन, मरूत ड्रोन, धारा अमृत ऑरगॅनिक, राजकमल आर्ट, अॅग्रीवाईब फार्मटेक, स्वतीक पाईप्स, लक्ष्मी हैड्रोलिक्स, लोकमंगल समूह, कृषी विज्ञान केंद्र, जिल्हा रेशीम कार्यालय, कोठारी अॅग्रोटेक, बालाजी यादव, तसेच विविध शेतकरी, विद्यार्थी व महाविद्यालये समाविष्ट होती.

# अजिंक्यराणा पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनास निवेदन



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):–** मोहोळ ते कुरूल-विजयपूर महामार्गावर वाढत असलेल्या अपघातांना येथील जड वाहतूक कारणीभूत असून नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांनी मोहोळ येथे केली. आवश्यक ठिकाणी गतिरोधक बसवणे, सूचनाफलक लावणे तसेच रस्त्याचे रुंदीकरण करणे या मागण्या त्यांनी प्रशासनाकडे केल्या. येत्या काळात प्रशासन स्तरावरून ठोस उपाययोजना न झाल्यास भाजपाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

अजिंक्यराणा पाटील यांच्या नेतृत्वाखाली आजी-माजी नगरसेवक व भाजप पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत महसूल प्रशासनास निवेदन देण्यात आले. यावेळी पाटील बोलत होते.

निवेदनात भाजप जिल्हा उपाध्यक्ष सुशील क्षीरसागर यांनी नमूद केले की, मोहोळ-कामती-मंद्रुप-विजयपूर रस्ता हा मोहोळ शहरातून जात असून तालुक्यातील दक्षिण भागातील ग्रामीण परिसराला जोडणारा मुख्य मार्ग आहे. या मार्गावरील वाढत्या रहदारीमुळे आजपर्यंत अनेक अपघात झाले असून शाळकरी मुले व ज्येष्ठ नागरिकांनी जीव गमावला, तर अनेकांना कायमचे अपंगत्व आले आहे. या रस्त्यावर अद्याप गतिरोधक व सूचनाफलक नसल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे. या महामार्गाचे रुंदीकरण करून किमान दहा मीटर रुंद करणे, साईड पट्ट्या तयार करणे तसेच जड वाहतूक पर्यायी मार्गाने वळवणे आवश्यक असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले. येत्या काळात हा मार्ग चौपदरीकरण करण्यासाठी भाजपाच्या माध्यमातून केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे मागणी करण्यात येणार असल्याची माहिती अजिंक्यराणा पाटील यांनी दिली.

यावेळी बाळासाहेब गायकवाड, संजीव खिलारे, नगरसेवक सतीश काळे, प्रमोद डोके, मुस्ताक शेख, दत्ता खवळे, संतोष सुरवसे, रोहित फडतरे, रुपेश धोत्रे, एजाज तलफदार, अझरुद्दीन कुरेशी, प्रशांत गाढवे, समाधान पाटील, बालाजी नरोटे, नवनाथ गाढवे, ओंकार देशमुख, सागर लेंगरे, नाना डोके, जयवंत गुंड, तुळजाराम धोत्रे, दादा ओहोळ यांच्यासह शहर व तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाबासाहेबांच्या विचारांवर उभा आहे आधुनिक भारत :- आ. दिलीप सोपल



**बार्शी (कटूसत्य वृत्त):–** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला संविधान देऊन लोकशाहीची मजबूत पायाभरणी केलीच; परंतु त्याचबरोबर जलसंधारण, जलसंवर्धन, कृषी व विद्युत क्षेत्रातही मूलभूत आणि क्रांतिकारी योगदान दिले, असे प्रतिपादन बार्शीचे आमदार दिलीप सोपल यांनी केले.

प्रबुद्ध भारत चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित एकदिवसीय प्रांतिक बहिष्कृत परिषदेचे उद्घाटन आ. दिलीप सोपल यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर येथील ज्येष्ठ विचारवंत दत्ता गायकवाड होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून अंबाजोगाई येथील सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे उपस्थित होते.

आ. सोपल पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रथम सोलापूर जिल्'ात बार्शी येथे आले, याचा बार्शीकरांना अभिमान आहे. बाबासाहेबांनी स्त्रियांना मतदानाचा अधिकार संघर्षाशिवाय दिला. त्यामुळेच आज सामाजिक व राजकीय क्षेत्रात महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून येतो.

अध्यक्षीय भाषणात दत्ता गायकवाड यांनी सोलापूर जिल्'ात बाबासाहेबांनी केलेल्या भेटींचा सविस्तर आढावा घेतला. तर डॉ. कमलाकर कांबळे यांनी बाबासाहेबांच्या चळवळीचा, त्यागाचा आणि क्रांतिकारक लढ्याचा विचार मांडला.

यावेळी व्यासपीठावर श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर प्रशांत पैकेकर उपस्थित होते. तसेच दत्ता गायकवाड, ज्येष्ठ साहित्यिक योगीराज वाघमारे आणि बार्शीतील कांदा व्यापारी सावळा शिंदे यांना मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. टी. एस. मोरे यांनी केले.नागनाथ सोनवणे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. अंजना गायकवाड यांनी केले.

या परिषदेसाठी प्रबुद्ध भारत चॅरिटेबल ट्रस्टचे पदाधिकारी विष्णू कांबळे, प्रा. डॉ. आर. बी. भोसले, प्रा. डॉ. शशिकांत गायकवाड, प्रा. डी. डी. मस्के, प्रा. अशोक वाघमारे, प्रा. एस. एन. शिंदे, प्रा. टी. एस. गायकवाड, तसेच जगन्नाथ शिवशरण, सुदर्शन ओहाळ, नवनाथ कदम, सुनील कांबळे, भीमराव कदम, विक्रम सुरवसे, मधुकर पालखे, रावसाहेब भालेराव, प्राचार्य रत्नदीप सोनकांबळे, प्रा. तानाजी ठोंबरे, डॉ. दिलीप कदम, श्यामराव जवंजाळ, बी. बी. भालेराव यांच्यासह राज्यभरातून मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# पंढरपूर अर्बन बँक सहकार क्षेत्रातील ग्रीन वर्ल्ड पुरस्काराने सन्मानित



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):–** आंतराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल ग्रीन वर्ल्ड को-प्राईड पुरस्कार आपल्या दि पंढरपूर अर्बन को-ऑप.बँक लि.पंढरपूरला महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील, सहकार आयुक्त दीपक तावरे यांच्या शुभहस्ते प्रदान करणेत आला, शतकोत्तर वाटचाल करीत असलेल्या आपल्या बँकेस ही सन्मानाची बाब असल्याचेही बँकेचे चेअरमन सतीश मुळे यांनी यावेळी नमूद केले.

ग्रीन वर्ल्ड व कॉसमॉस को-ऑप.बँक लिमीटेड यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार मंथन 2025 हा कार्यक्रम सहकार सभागृह, कॉसमॉस टॉवर, शिवाजी नगर, पुणे येथे संपन्न झाला. हा पुरस्कार बँकेचे वतीने संचालक पांडुरंग घंटी, गणेश शिंगण, मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे व व्यवस्थापक गणेश हरिदास, योगेश जगताप यांनी स्विकारला अशी माहिती बँकेचे चेअरमन सतीशजी मुळे यांनी दिली. सध्या बँकेने गृह व वाहन कर्जा बरोबरच महाराष्ट्र शासनाच्या आण्णासाहेब पाटील, वसंतराव नाईक, आई अशा विविध व्याज परतावा योजनामध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवून कर्ज पुरवठा करीत आहे, त्याचा फायदा व्यवसाय वृध्दीसाठी घ्यावा असे आवाहन यावेळी मुळे यांनी केले.

सदर कार्यक्रमास महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रात काम करीत असणाऱ्या बहुसंख्य बँकांचा समावेश होता. महाराष्ट्र सहकारी बँकेचे प्रशासक श्री. विद्याधर अनास्कर, कॉसमॉस बँकेचे सीए मिलींदजी काळे, ग्रीन वर्ल्डचे गौतम कोतवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

# महावितरणची घरबसल्या सेवा; दोन महिन्यांत ५८ हजार ग्राहकांनी नावात बदल केला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** महावितरणने वीज कनेक्शनच्या नावात बदलासाठी सुरू केलेल्या स्वयंचलित मंजुरी सुविधेमुळे राज्यातील वीज ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. केवळ दोन महिन्यांच्या कालावधीत राज्यभरातून ५८ हजार १६७ ग्राहकांनी घरबसल्या वीज कनेक्शनच्या नावात बदल करून घेतला, अशी माहिती महावितरणच्या अधिकाऱ्यांनी दिली. या लाभार्थ्यांमध्ये सोलापूर जिल्'ातील वीज ग्राहकांचाही समावेश आहे.

यासोबतच मंजूर वीजभार वाढवण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या ऑनलाईन सुविधेचा १० हजार ४२८ ग्राहकांनी लाभ घेतला आहे.

वीज ग्राहकांना अधिकाधिक सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देऊन त्यांना कार्यालयात जाण्याची गरज भासू नये, या उद्देशाने महावितरणकडून विविध डिजिटल सुविधा कार्यान्वित करण्यात येत आहेत.

घर अथवा अन्य मालमत्तेच्या खरेदी-विक्री, वारसा हक्क किंवा इतर कारणांमुळे मालकीत बदल झाल्यानंतर वीजबिलावरील नाव बदलणे आवश्यक असते. यासाठी आता महावितरणच्या मोबाईल अॅपद्वारे 'लॉग-इन' करून ऑनलाइन अर्ज करता येतो. नाव बदलण्याचे कारण निवडल्यानंतर आवश्यक ते दाखले ऑनलाईन अपलोड करून प्रक्रिया शुल्क भरावे लागते. त्यानंतर ३ ते ७ दिवसांत नाव बदलाची प्रक्रिया पूर्ण होते.

तसेच लघुदाब वर्गवारीतील वीज भारवाढीच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित मंजुरी देण्याच्या निर्णयामुळे घरगुती ग्राहकांना, विशेषत:प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ घेणाऱ्यांना, तसेच औद्योगिक, व्यावसायिक व इतर लघुदाब ग्राहकांना मोठा फायदा होत असल्याचे महावितरणच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# धार्मिक ते राजकीय क्षेत्रात महेश इंगळेंचा ठसा



**क्कलकोट (कटूसत्य वृत्त):–**अक्कलकोट येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तसेच नगरपरिषद प्रभाग क्रमांक ११ मधून सलग पाच वेळा निवडून आलेले नगरसेवक महेश इंगळे हे विनयशील व सर्वसामान्यांशी नाळ जोडणारे व्यक्तिमत्त्व असून त्यांनी धार्मिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात भरीव काम केले आहे, असे प्रतिपादन मनीषा कृषी उद्योगचे चेअरमन व चपळगावचे सरपंच उमेश पाटील यांनी केले.

नुकत्याच पार पडलेल्या अक्कलकोट नगरपरिषद निवडणुकीत भाजपाचे उमेदवार महेश इंगळे यांनी विजय मिळविला. या पार्श्वभूमीवर श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात सरपंच उमेश पाटील यांच्या हस्ते महेश इंगळे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

पाटील पुढे म्हणाले की, श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या असंख्य भाविकांपासून ते राज्यभरातील विविध क्षेत्रांतील नागरिकांपर्यंत महेश इंगळे यांचे जिव्हाळ्याचे नाते आहे.

सर्वसामान्यांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांची तत्परता, प्रामाणिक प्रयत्न व लोकाभिमुख दृष्टिकोन त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची साक्ष देतात.यावेळी प्रथमेश इंगळे, महेश पाटील, दीपक पाटील, सुरेश सुरवसे, श्रीशैल गवंडी, बाळासाहेब एकबोटे, अंकुश केत, सागर गोंडाळ, दर्शन घाटगे, धनराज स्वामी, सुनील पवार आदी उपस्थित होते.

# स्पर्धा परीक्षा विद्यार्थांना न्याय द्यावा-खा.मोहिते पाटील



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** स्पर्धा परीक्षा विद्यार्थांना न्याय द्यावा अशी मागणी माढा लोकसभा मतदार संघाचे लोकप्रिय खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे नुकतीच केली आहे.

**खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी सादर केलेल्या निवेदनात**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) घेण्यात येणाऱ्या संयुक्त पूर्व परीक्षा 2025 संदर्भात वयोमर्यादा सवलत देण्याबाबत मागणी करण्यात आली आहे. तसेच सदर निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या संयुक्त पूर्व परीक्षा 2025 साठी तयारी करणाऱ्या राज्यातील हजारो स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांना वयोमर्यादेबाबत गंभीर अडचणी निर्माण झालेल्या आहेत.

सदर विषयासंदर्भात विद्यार्थ्यांच्या कडून गेल्या ५-६ महिन्यांपासून शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असूनही अद्याप कोणताही सकारात्मक निर्णय झालेला नाही, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे.

**विद्यार्थ्यांनी मांडलेल्या प्रमुख समस्या पुढीलप्रमाणे आहेत**

1) महाराष्ट्र शासनाने पोलिस शिपाई भरतीसाठी वयोमयार्दा २८ वर्षांवरून ३५ वर्षांपर्यंत वाढवलेली आहे. मात्र, त्याच गृह विभागांतर्गत येणाऱ्या पोलिस उपनिरीक्षक (PSI) पदासाठी केवळ १ वर्षाची वयोमयार्दा सवलत देण्याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. त्यामुळे शासनाने पोलिस उपनिरीक्षक (PSI) पदासाठी तात्काळ १ वर्षाची वयोमर्यादा सवलत जाहीर करावी, अशी विद्यार्थ्यांची रास्त मागणी आहे.

2) संयुक्त पूर्व परीक्षा 2025 ची जाहिरात प्रसिद्ध होण्यास सुमारे ७ महिन्यांचा विलंब झाला आहे. तसेच वयोमर्यादा गणनेसाठी १ नोव्हेंबर 2025 हा दिनांक निश्चित करण्यात आल्याने, केवळ काही दिवसांच्या फरकामुळे हजारो विद्यार्थ्यांची शेवटची संधी हिरावली जात आहे. त्यामुळे वयोमर्यादा गणनेसाठी १ जानेवारी 2025 हा दिनांक ग्रा' धरण्यात यावा, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे.

वरील दोन्ही मागण्या या पूर्णपणे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी निगडित असून त्या पूर्णपणे रास्त व न्याय्य आहेत.

तरी महाराष्ट्र शासनाने या विषयाकडे सकारात्मक व सहानुभूतीपूर्वक तातडीने लक्ष देऊन योग्य निर्णय घ्यावा व स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांना न्याय द्यावा अशी मागणी खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी केली आहे.

# स्वत:वर विश्वास ठेवून तुमचे धैर्य निश्चित करा- अंबिका बांदल



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):–** तुमचे भविष्य उज्वल आहे आणि ते घडवण्याची शक्ती तुमच्या हातात आहे. तुम्ही जे काही करता ते मनापासून करा. स्वत:वर विश्वास ठेवून तुमचे धैर्य निश्चित करा आणि कठोर परिश्रमाची तयारी ठेवा असे मत अंबिका बांदल यांनी नातेपुते येथील एस. एन. डी. सीबीएसई स्कूलमध्ये क्रिसमस निमित्त घेण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले. त्या पुढे बोलत असताना म्हणाले की, तुम्ही जे काही करता ते मनापासून करा. चुका होतील पण प्रत्येक चूक तुम्हाला एक नवीन गोष्ट शिकवून जाईल. तुमच्या स्वप्नांचा पाठलाग करा एस. एन. डी. स्कूलच्या शिक्षकांची मेहनत व तुमचे समर्पण तुम्हाला नक्कीच यशस्वी करेल असे प्रतिपादन कार्यक्रमाच्या अध्यक्षा अंबिका बांदल यांनी व्यक्त केले.याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावर रेणुका घोरपडे, श्रुतिका देशमुख, ज्योती पिसाळ देशमुख, दीपिका शिंदे, श्रद्धा देशमुख, मेघा पाटील, स्वप्ना शेटे, रोहिणी पलंगे व्यासपीठावर उपस्थित होत्या उपस्थित व्यासपीठावरील मान्यवरांच्या शुभ हस्ते प्रतिमा पूजन, दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. इयत्ता नर्सरी ते इयत्ता पाचवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या गाण्यांवरती सांस्कृतिक कार्यक्रम दाखवून प्रेक्षकांची मने जिंकली. यावेळी एस. एन. डी. स्कूलचे संस्थापक अध्यक्ष तथा सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख, चेअरमन मालोजीराजे देशमुख, नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे, सेक्रेटरी रोहित शेटे, विश्वजीत पिसाळ, शक्ती पलंगेउपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रायमरी विभागप्रमुख नीलम डोंबाळे यांनी केले. मुख्याध्यापक संदीप पानसरे, उप मुख्याध्यापक शकूर पटेल, पीआरओ मनोज राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक, शिक्षिका, कर्मचारी यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते. कार्यक्रम पाहण्यासाठी मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होता.

> आजचा कार्यक्रम सर्वांसाठी कौतुकाचा आहे.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भावनिक व शारीरिक वाढीमध्ये पालक म्हणून आपण उत्तम भूमिका बजावत आहात. त्याचे उत्तम उदाहरण आज आपल्या सहभागाने या ठिकाणी दिसून आले. प्रत्येक जण आयुष्यात यशस्वी व्हायचं स्वप्न पाहतो परंतु यश मिळवण्यासाठी परिश्रम मेहनत संयम या गोष्टीची गरज असते.विद्यार्थ्यांनी सकारात्मक रहात सातत्य ठेवून कधीही अपयशांना घाबरू नये
>
> **– रेणूका घोरपडे**

# श्रमसंस्कार शिबीरातून स्वयंसेवकाचा व्यक्तिमत्व विकास - सौ.प्रियंकाताई पाटील



**अनगर (कटूसत्य वृत्त):–** बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,सोलापूर आयोजित मौजे बिटले येथे विशेष श्रम संस्कार शिबीराचा उदघाटन समारंभ आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत सुर्यवंशी हे होते व प्रमुख पाहुणे म्हणून श्री अनगरसिद्ध शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा सौ. प्रियंकाताई बाळराजे पाटील या होत्या.या प्रसंगी सौ.प्रियंकाताई पाटील यांनी रा.से.यो.इतिहास सांगून शिबीरातून स्वयंसेवकाचा विकास हे विविध उदाहरणे देऊन मार्गदर्शन केले.या प्रसंगी प्राचार्य डॉ.चंद्रकांत सुर्यवंशी यांनी शिबीरातून गावच्या विविध समस्या सोडविणे गरजेचे आहे असे मार्गदर्शन केले.या प्रसंगी अनगर नगर पंचायतचे मुख्याधिकारी सुरेश भदर, वाचनालयाचे अध्यक्ष शरद सलगर, मोहोळ येथील एस.बी. आय.मॅनेंजर उत्तम भदाडे यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयातील रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.प्रकाश शेटे यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा.महादेव चव्हाण यांनी केले व आभार प्रा.सागर तळणकर यांनी मानले.या कार्यक्रमासाठी बिटले गावच्या सरपंच सौ. अर्चना काळे,दाजी काळे,सुनिल सलगर,सौ.माधवी साठे,सौ.रेश्मा थिटे,ग्रामविस्तार अधिकारी गणेश वेदपाठक,ग्रामस्थ,प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी व स्वयंसेवक उपस्थित होते.

प्रवेश ! प्रवेश !! प्रवेश !!!

## ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा २०२६ प्रवेशासाठी आवाहन

ग्रंथालय संचालनालय, मुंबई यांच्या वतीने जानेवारी २०२६ ते जून २०२६ या सहा महिन्याच्या कालावधीत ग्रंथपालन प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्ग चालणार आहेत. सुधारित अभ्यासक्रमानुसार प्रवेशा करता बारावी कोणत्याही शाखेत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा ग्रंथालय संघामार्फत वर्ग चालविले जातात.

प्रवेशासाठी बारावीची गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड इत्यादींच्या प्रमाणीत प्रती आणि चार पासपोर्ट साईज फोटोसह संपर्क करावा. हा अभ्यासक्रम डि.एड. समकक्ष आहे. इच्छुकांनी डिसेंबर २०२५ मध्ये आपआपल्या जिल्हा ग्रंथालय संघाशी संपर्क साधावा.

-: संपर्क :-

**सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ, सोलापूर**
हुतात्मा स्मारक, मार्कंडेय उद्यान, अशोक चौक
पोलीस चौकी समोर सोलापूर 413005
संपर्क करिता मोबाईल नंबर
9890908320,7350922276,8308178551